RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२९)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXVIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६८.**

**महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९७८ चा महा. ३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९७८ चा महा. ३ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** (१) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ याच्या कलम २ मध्ये :—

(क) पोट-कलम (८) मधील मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा,

" विद्यमान खाजगी शाळा " म्हणजे " नेमलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली मान्यताप्राप्त खाजगी शाळा किंवा राज्य शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार राज्याबाहेरील मंडळांशी किंवा संस्थांशी किंवा परदेशी मंडळांशी संलग्न असलेली खाजगी शाळा;"

(ख) पोट-कलम (२०) मधील मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.

" खाजगी शाळा " म्हणजे, " शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याव्यतिरिक्त अन्य व्यवस्थापनाने, स्थापन केलेली किंवा प्रशासनाने चालवलेली मान्यताप्राप्त शाळा किंवा राज्य शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार राज्याबाहेरील मंडळांशी किंवा संस्थांशी किंवा परदेशी मंडळांशी किंवा संस्थांशी संलग्न असलेली शाळा; "

(ग) पोट-कलम (२१) मधील मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा,

" मान्यताप्राप्त " म्हणजे, " संचालकाकडून अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडून किंवा राज्य मंडळाकडून किंवा उपविभागीय मंडळाकडून किंवा राज्य शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार राज्यातील किंवा राज्याबाहेरील किंवा परदेशी मंडळाकडून किंवा संस्थांकडून मान्यताप्राप्त ; "

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यात, राज्य शासनाच्या परवानगीने अनेक खाजगी शाळा तसेच ICSE, CBSE, IGCSE व IB अभ्यासक्रमाच्या शाळा सुरू असून या शाळांच्या व्यवस्थापन पद्धतीत असंख्य विसंगती आहेत. या शाळांनी, शाळा प्रवेशाचे वय, शालेय कालावधी, घटनात्मक आरक्षणे, सार्वजनिक सुट्ट्या, राष्ट्रीय कार्यक्रम व अशा अन्य बाबींबद्दल अत्यंत आक्षेपार्ह पद्धत अंगिकारलेली आहे. सर्वसामान्य पालकांना न परवडणारी फी आकारणे तसेच कोणतेही निकष न लावता आपल्या मर्जीप्रमाणे वर्गप्रवेश देण्याची पध्दत त्या शाळांनी अवलंबलेली आहे. त्याचबरोबर, तेथे काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सेवा व सेवाशर्ती, शैक्षणिक अर्हता, त्यांचे वेतन यामध्ये असंख्य अनियमितता आढळून आल्या असून प्रत्येक संस्थेचे स्वतंत्र नियम आहेत व राज्याचे नियम या शाळा पाळत नाहीत असे निदर्शनास आले आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निश्चित स्वरुपाची सेवा शर्ती नियमावली लागू करून त्यांच्या वेतनमानास संरक्षण देणे गरजेचे आहे. या शाळा राज्यातील मूलभूत तसेच पायाभूत सुविधा उपभोगतात परंतु राज्य शासनाचे नियम मात्र त्यांना अमान्य आहेत.

अशा शाळांनी राज्यातील सर्वसामान्य जनतेपुढे विशेषकरून पालकांसमोर ज्या वर उल्लेखित समस्या निर्माण केल्या आहेत तसेच ज्या अनियमिततेने व अनिर्बंधपणे त्यांचे प्रशासन चालविण्यात येत आहे, अशा पध्दतींवर मात करण्यासाठी संबंधित अधिनियमात सुधारणा करणे आवश्यक झालें आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ जून, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ०४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.